PMAY

कार्यकारी अभियंता कार्यालय
प्रधानमंत्री आवास योजना
स्वा. सावरकर उद्योग भवन चौथा मजला
पुणे महानगरपालिका
जावक क्र :- PMAY/७००
दिनांक :- २९/१२/२०२५.

अपिल प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका

अपिल क्रमांक: पुणे महानगरपालिका/अ.प्रा. तथा कार्यकारी अभियंता /अपिल क्र.०१ .२३/१२/२०२५

अपिलकत्यांचे नाव व पता:-श्रीम संजीवनी हणमंतराव कदम
गेट नं.६१५/२ flat नं.बी -१०१
उत्सवा रेसिडेन्सी कोरेगाव भीमा,
ता.शिरूर,जि.पुणे
पुणे -४१२२१६

जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा :- श्री.प्रशांत महिंद्रकर
जन माहिती अधिकारी तथा
उप अभियंता

संजीवनी हणमंतराव कदम

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पुणे महानगरपालिका

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) आन्वये अपिल

माहिती अधिकारातील अर्जाचा तपशिल				
माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक	माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक	अर्जदारास उत्तर पाठविल्याचा दिनांक	अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक	अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक
१	२	३	४	५
दि.१३-१०-२०२५	दि.१२-११-२०२५	दि.०४-११-२०२५	-	

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण असमाधानकारक माहिती दिल्याबाबत.

प्रथम अपिल अर्जाचा तपशिल				
प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक	प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक	प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ?	प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ?	प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक
१	२	३	४	५
दि.०३-१२-२०२५	दि.०२-१२-२०२५	होय	-	१) दि.०५-१२-२०२५ सुनावणी झाली नाही. २) १५-१२-२०२५

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि.२३/१२/२०२५ वेळ दुपारी ४.०० वा.
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जन माहिती अधिकारी :- उपस्थित

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशिल :-

अ.क्र	अर्जदाराने मागितलेली माहिती	जन माहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर / माहिती
१.	शिवनेरी बी पीएमएवाय सह.गृहसंस्था मर्यादित, स.नं.५७ अर्बन निरवना सोसायटी शेजारी खराडी पुणे या सोसायटीची माहिती मिळणेबाबत.	अर्जाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते कि, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.७१/१८ (र.व.का.) दि.१४.१०.२०१९ रोजीचे शासन आदेशान्वये शासकीय कार्यालयात अर्ज करणे, विल्हेवाट लावण्याबाबत असलेल्या शासन आदेशाचा आधार घेऊन व्यक्तिगत गाऱ्हाण्या संदर्भात अर्ज ज्या व्यक्तीवर अन्याय झालेला असेल त्याच्याकडून स्वीकारण्यात यावेत, एंजटकडून किंवा त्यांच्या मार्फत शासनास करण्यात आलेल्या अर्जाची दखल घेण्यात येऊ नये, अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे त्रयस्थ व्यक्ती, संस्था यांच्याकडून अन्य व्यक्तीच्या वैयक्तिक गाऱ्हाण्यासंबंधी पत्रव्यवहार किंवा पाठपुरावा करण्यात आल्यास त्याची दखल घेऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. वर नमूद शासन आदेशाच्या अनुषंगाने विषयात नमूद मिळकतीशी असलेला आपला वैयक्तिक हितसंबंध कळविल्यास आपले मागणीनुसार सदर मिळकतीच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या प्रती आवश्यक ते शुल्क आकारून आपणांस देण्यात येतील.

- विवेचन -

अपिलार्थी श्रीमती संजीवनी हनुमंतराव कदम यांनी दि.२६/०५/२०२५ रोजी महापालिका आयुक्त कार्यालयाकडे माहिती अधिकाराचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जा मधील माहिती पंतप्रधान आवास योजनेतील इमारतीबाबत असल्याने सदरचा अर्ज बरोबरच्या विभागामार्फत या विभागाकडे आवक क्र.४५७ दि.१३/१०/२०२५ अन्वये आलेला आहे.

अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी श्री.प्रशांत सह्याद्रिकर यांनी संबंधित सेक्शन सेक्रेटरी यांना जावक क्र.५९९ दि.२९/१०/२०२५ अन्वये कलम ११(१) अन्वये खुलासा मागविण्यात आला आहे. त्याअनुषंगाने सोसायटी मार्फत आवक क्र.५०० दि.०४/११/२०२५ अन्वये योगायोगीची संबंधित माहिती न देणेबाबत कळविण्यात आले आहे. तदनंतर अपिलार्थी यांना जावक क्र.६०५ दि.०४/११/२०२५ अन्वये माहिती मागविलेल्या मिळकतीशी वैयक्तिक हितसंबंध बाबत कळविण्यास तरीच शासन निर्णय दि.०४/१०/२०१९ अन्वये देखी कळविण्यात आले आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी प्रथम अपिल दिनांकापर्यंत त्यांचे वैयक्तिक हितसंबंधाबाबत कोणतेही कागदपत्र दाखल केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी श्रीमती संजीवनी कदम यांनी दि.०७/११/२०२५ अन्वये अपिलाचा अर्ज शहर अभियंता कार्यालयाकडे दाखल केला आहे. सदरचा प्रथम अपिलाचा अर्ज या विभागाकडे आवक क्र.५५६ दि.०२/१२/२०२५ अन्वये प्राप्त झालेला आहे. अपिलामध्ये मुद्दा क्र. १ ते ४ मध्ये नमूद केल्याच्या कारणास्तव प्रथम अपिलाचा अर्ज दाखल केल्याचे नमूद केले आहे.

वरील प्रमाणे अवलोकन करता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

- आदेश -

अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती बाबत संबंधित सोसायटी मार्फत अपिलार्थी यांना माहिती न देण्याबाबत कळविलेले आहे. तरीच दि.०४/११/२०२५ या पत्राच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी वैयक्तिक हितसंबंधबाबत कोणतेही कागदपत्र सादर केल्याचे दिसून येत नसल्याने अपिलार्थी श्रीमती संजीवनी कदम यांचा प्रथम अपिलाचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

२३/१२

(विश्वास नवाळी)
प्रथम अपिलीय अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता
प्रधानमंत्री आवास योजना,
पुणे महानगरपालिका
(मो.नं.९६८२९३१८३१)

दिनांक :- २३/१२/२०२५
ठिकाण :- पुणे

टिप :- १) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसांच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे ,नविन प्रशासकीय इमारत, ४ था मजला , पुणे यांचेकडे अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

२) या आदेशाची प्रत पुणे महानगरपालिकेच्या www.Punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.